|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

'A' Grade
NAAC Re-accredited
(4th Cycle)

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

## Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

(Formerly North Maharashtra University, Jalgaon)

**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

**गुणपडताळणी (Only Verification) , उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत (Photocopy with verification) व पुनर्मूल्यांकन (Redressal - Challenge to Valuation) इत्यादी प्रक्रियेसाठी ऑनलाईन अर्ज सादर करणेबाबत.**

**परिपत्रक क्र. ०३ /२०२३**

सर्व संबंधितांना अवगत आहे की, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाद्वारे अध्यादेश क्र.१३४/२००७ नुसार गुणपडताळणी (Verification), उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत (Photocopy) व पुनर्मूल्यांकन (Redressal) इत्यादी प्रक्रिया केली जाते.

त्यास अनुसरून कळविण्यात येते की, विद्यापीठाद्वारा हिवाळी २०२२ च्या परीक्षेपासून उत्तरपत्रिकांचे प्रथम वर्ष कला, विज्ञान, वाणिज्य, बी.व्होक., बी.एस.डब्ल्यू. इ. वर्गाच्या परीक्षांचे उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन प्रचलित पध्दतीने महाविद्यालयीन स्तरावर करण्यात येत असून, इतर वर्गांच्या परीक्षांच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन (Assessment) Onscreen Digital Evaluation System या संगणकीय प्रणालीद्वारे ऑनलाईन पध्दतीने करण्यात येत आहे. सदर प्रक्रिया शीघ्र गतीने व्हावी यासाठी प्रथम वर्ष कला, विज्ञान, वाणिज्य, बी.व्होक., बी.एस.डब्ल्यू. इत्यादी वर्ग तसेच आर्किटेक्चर अभ्यासक्रम वगळता इतर सर्व वर्गांच्या गुणपडताळणी (Only Verification), उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत (Photocopy with verification) व पुनर्मूल्यांकन (Redressal- Challenge to Valuation) इत्यादी प्रक्रियादेखील ऑनलाईन पध्दतीने करण्यात येणार आहे.

अभ्यासक्रमनिहाय निकाल जाहीर झाल्यापासून उपरोक्त प्रक्रिया हिवाळी २०२२ च्या परीक्षापासून ऑनलाईन पध्दतीने करण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे कार्यपध्दत अवलंबण्यात यावी.:-

(१) उपरोक्तकामी **प्रथम वर्ष कला, विज्ञान, वाणिज्य, बी.व्होक., बी.एस.डब्ल्यू. इत्यादी वर्ग तसेच आर्किटेक्चर अभ्यासक्रम वगळता इतर सर्व वर्गांच्या विद्यार्थ्यांना** अध्यादेश क्र.१३४/२००७ नुसार विहित मुदतीत खालीलप्रमाणे ऑनलाईन अर्ज सादर करणेबाबत अवगत करण्यात यावे.:-

| अ.क्र. | अर्जाचे प्रकार | ऑनलाईन अर्ज सादर करण्याची मुदत |
|---|---|---|
| १) | गुणपडताळणी (Only Verification) | संबंधित वर्गाचा निकाल जाहिर झाल्यापासून २१ दिवसांच्या आत |
| २) | उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत (Photocopy) | संबंधित वर्गाचा निकाल जाहिर झाल्यापासून १५ दिवसांच्या आत |
| ३) | पुनर्मूल्यांकन Redressal- Challenge to Valuation) | उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत (Photocopy of Answerbook) मिळाल्यापासून ०८ दिवसांच्या आत |

(२) गुणपडताळणी (Only Verification), उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत (Photocopy of Answerbook) व पुनर्मूल्यांकन (Redressal- Challenge to Valuation) इत्यादीसाठी विद्यार्थ्यांनी स्वतः https://kbcnmu-exams.com/studentlogin या लिंक जाऊन पुढीलप्रमाणे विहित शुल्क + अर्ज शुल्क **रू.१०/- भरुन** Online Payment करावे. सदरचे शुल्क नापरतावा (Non refundable) राहील. अर्जाची Print घेवून स्वतःकडे ठेवावी, ह्या अर्जाची प्रिंट विद्यापीठाकडे पाठवू नये. पुढील प्रक्रिया/ कार्यवाहीबाबत विद्यार्थ्यांना sms व्दारे कळविले जाईल.

| अ. क्र. | अभ्यासक्रम | गुणपडताळणी शुल्क (Only Verification) | उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत (Photocopy of Answerbook) | पुनर्मूल्यांकन (Redressal- Challenge to Valuation) |
|---|---|---|---|---|
| १) | व्यावसायिक अभ्यासक्रम | रु.५०/- | रु.२००/- (प्रती उत्तरपत्रिका) | रु.४००/- (प्रती उत्तरपत्रिका) |
| २) | अव्यावसायिक अभ्यासक्रम | रु.५०/- | रु.१००/- (प्रती उत्तरपत्रिका) | रु.१५०/- (प्रती उत्तरपत्रिका) |

(३) अभियांत्रिकी विद्याशाखेचे ज्या विषयांना Drawing Sheet चे आहेत त्यांचे व आर्किटेक्चर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचे गुणपडताळणी (Only Verification), उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत (Photocopy of Answerbook) व पुनर्मूल्यांकन (Redressal- Challenge to Valuation) चे अर्ज Manually पध्दतीने सादर करण्यात यावेत.

उपरोक्त बाबी सर्व विद्यार्थी व सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून देवून विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

**(प्रा. दिपक श. दलाल)**
**प्र. संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

**जा.क्र.कबचौउमवि/७अ/४५२ /२०२३,**
**दिनांक : १६/०२/२०२३**

प्रति,
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित
सर्व महाविद्यालयांचे मा. प्राचार्य आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांचे संचालक.

**प्रत माहितीस्तव तथा कार्यवाहीस्तव:-**

१) मा. वित्त व लेखा अधिकारी, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव
२) परीक्षा व मूल्यमापन मंडळातील सर्व उपविभागांचे प्रमुख/नियंत्रक अधिकारी, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव
३) यंत्रणा विश्लेषक/ विशेष कार्य अधिकारी, संगणक केंद्र, (परीक्षा व मूल्यमापन मंडळ) क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव
४) समन्वयक, विद्यार्थी ई-सुविधा केंद्र, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव
५) जनसंपर्क अधिकारी, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव -बातमी रूपाने प्रसिध्दीसाठी

**प्रत माहितीस्तव अग्रेषित:-**

१) मा.कुलगुरू कार्यालय, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव
२) मा.प्र.कुलसचिव कार्यालय, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव